**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VIII | ISSUE- VIII | AUGUST | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे साहित्य आणि स्त्रीवादी चळवळ

**Dr. Mrs. Suvarna Prakash Patil.**
Head, Deapartment of History.
Miraj Mahavidyalaya, Miraj
Tal. – Miraj, Dist. Sangli.
Pin. – 416410, Maharashtra.
Email ID – suvarnapatil3302@gamil.com

**सारांश –**

*साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हणतात. समाजातील सर्वक्षेत्रातील घडामोडी साहित्यामध्ये प्रतिबिंबीत होताना दिसतात. त्याअनुषंगाने समाजामध्ये ज्या सामाजिक चळवळी होतात त्या चळवळीशी संबंधीत व्यक्तीकडून साहित्य निर्मिती होत असते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे महिला सुधार चळवळीतील अग्रगण्य नाव आहे. त्यांनी स्त्रीयांच्या शिक्षणासाठी स्वतः शिक्षण घेतले. महात्मा फुलेंच्या मार्गदर्शन व सहकार्याने महाराष्ट्रात व भारतातही स्त्रीशिक्षणाचा पाया रचला. 'शिक्षणाने पशुत्व हटते' या उक्तीप्रमाणे त्यांनी शिक्षणाचा प्रसार करून महिलांना मुक्तीचा मार्ग मोकळा केला. महिलांच्या इतर प्रश्नांवर सुध्दा त्यांनी उपाय शोधून काढले. बाल जरठ विवाहाला विरोध केला. विधवांच्या केशवपनाला विरोध केला. बालहत्या प्रतिबंध गृह काढले. बलात्कारीत पिडित स्त्रियांना आश्रय दिला. पोटासाठी शरीर विक्रय करणा-या स्त्रियांना आश्रय दिला. हे सर्व कार्य करत असताना. त्यांना साहित्य निर्माण केले. त्यामधील प्रमुख म्हणेज 'काव्यफुले', 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हे काव्यग्रंथ अत्यंत महत्त्वाचे आहेत. यामधून सावित्रीबाईंचे स्त्री प्रश्ना संदर्भात असणारी जाण व भाण लक्षात येते. त्यांनी महात्मा फुलेंना लिहिलेली पत्रे, विविध ठिकाणी दिलेली भाषणे यातूनही त्यांचे विचार व्यक्त होताना दिसतात. हे त्यांचे विचार स्त्रीवादाच्या चौकटीत बसणारे आहेत. स्त्रीयांना स्वतःच्या उध्दाराचा मार्ग मोकळा करून देणारे आहेत. स्त्रीयांनी अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, विषमता दूर करून पुरोगामीत्वाची, विज्ञानाची कास धरावी, वास्तवतेचा विचार करावा. आत्मभान जागृत करावे असा उपदेश साहित्यातून स्त्रियांना देतात.*

*हे सर्व साहित्य व त्यांची समाज सुधारणा चळवळ यांच्या सहसंबंधातून असे निश्चित होते की सामाजिक चळवळ व सुधारणामध्ये साहित्याचे योगदान मोठे आहे. साहित्य निर्मितीची प्रेरणा ही चळवळ असते. या दृष्टीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे साहित्य, त्यांचे जीवन, त्यांचे कार्य स्त्रीवादाच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाचे आहे.*

**प्रस्तावना –**

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. तो समाज करून समाजामध्येच राहतो. त्यामध्येच त्याचे सर्वांगीण हित असते. समाजाची निर्मिती होत गेली तसे समाजाचे हित संबंध निश्चित होत गेले. काळानुरूप त्यामध्ये बदल झाले. यामधूनच धर्म, संस्कृती, रूढी, परंपरा, वारसा, नैतिक, तात्वीक अशा संकल्पना निर्माण झाल्या या संकल्पना मध्यवर्ती राहून सामाजिक कृती, घटना प्रसंग घडत गेले. यामध्ये जेथे साचलेपण आले तेथे अधोगती, अत्याचार, अन्याय होत राहिले. याला उत्तर म्हणून किंवा प्रतिक्रीया म्हणून वैयक्तिक व सामाजिक पातळीवर जे विचार व कृती घडत गेल्या त्याला चळवळी म्हटले जाऊ लागले. यातून सुधारणा होत गेल्या. हे होत असताना साहित्याचाही वाटा उल्लेखनीय होता. चळवळीत कार्यकर्ते अथवा नेतृत्व करणा-यांनी समाज प्रबोधनासाठी, विचारांच्या प्रसारासाठी साहित्य निर्माण केले. ते महत्त्वाचे आहे.

**उद्दिष्ट्ये –**

१) महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी व साहित्य यांचा ऐतिहासिक संशोधन पध्दतीने अभ्यास करणे.
२) सामाजिक चळवळ व सुधारणेमधील साहित्याचे योगदान अभ्यासणे.
३) साहित्य निर्मिती पाठीमागील सामाजिक चळवळ व परिवर्तनाची प्रेरणा याची मांडणी करणे.
४) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या साहित्याच्या आधारे स्त्रीवादी चळवळीच्या मागोवा घेणे.

**संशोधन पध्दती –**

सदर संशोधन हे दुय्यम साधनांवर आधारित आहे. तथापी ही दुय्यम साधने प्राथमिक संदर्भावर निर्माण झाली आहेत. निरिक्षण, संकलन व परिक्षणांअंती निष्कर्षाप्रत पोहचण्याचा प्रयत्न आहे. ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा आधार घेऊन हा शोधनिबंध सादर केला आहे.

**विषय विवेचन –**

**सामाजिक चळवळी –**

समाजातील काही महत्त्वचे घटक समाज हितासाठी जे बदल करण्याचा प्रयत्न करतात किंवा समाजविघातक बदलांना संघटितपणे विरोध करतात त्यांना सामाजिक चळवळ म्हणतात.[१] या चळवळीतूनच समाजव्यवस्थेत विधायक, विकासाच्या दिशेला जाणारे सकारात्मक बदल घडत असतात. या सामाजिक चळवळी इतिहास, समाजशास्त्र यांचा महत्त्वाचा अभ्यास घटक आहेत.

**सामाजिक चळवळ आणि साहित्य –**

आधुनिक काळात चळवळ व साहित्य यांचा संबध दृढ असल्याचे लक्षात आले आहे. कारण साहित्यात साहित्यिकाने मांडलेले विचार हे प्रत्यक्ष अनुभवावर किंवा निरिक्षणावर आधारित असतात.[२] सामाजिक चळवळीत काम करणारे कार्यकर्ते अथवा प्रणेते हे सामाजिक समस्या प्रश्न इ. बाबतीत संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांच्याकडून निर्माण झालेली साहित्य निर्मिती ही चळवळीचा अविभाज्य भाग असते.

**साहित्य –**

कोणताही लेखक निसर्ग, समाज आणि स्वतःशी संवाद करण्याचे सामर्थ्य त्याच्या प्रत्यक्ष जगण्यातून व अनुभवातून कमवतो. त्यामुळे साहित्यव्यवहार हे मानवी जीवनाचे एक लहान अंग आहे. म्हणून साहित्याचा उगम आणि विकास हा मानवी जिवनातून घडतो असे म्हणतात.

**स्त्रीवादी चळवळ –**

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीयांच्या विकासाच्या प्रगतीच्या अनुषंगाने केलेला सर्वांगीण विचार होय. या विचारांचा उगम पाश्चिमात्य देशात झाला म्हटले असले तरी तद्सदृश्य विचार कृती व कमी जास्त फरकाने सर्वत्रच दिसून येतात. त्याला भारत व महाराष्ट्र सुध्दा अपवाद नाही.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले – (जन्म - ३ जानेवारी १८३१ मृत्यु - १० मार्च १८९७)**

सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका, शिक्षिका होत्या. पती महात्मा जोतिराव फुले यांच्या साथीने स्त्री शिक्षणाची मुहर्तमेढ रोवली. तसेच स्त्री भृणहत्या, विधवा विवाह, बाल विवाह प्रतिबंध, केशवपन, अस्पृश्यता यांचा गंभीर समस्यांवर कृतीशील कार्य केले. सत्यशोधक समाज या संघटनेचे ही त्यांनी कार्य केले. हे करत असताना त्यांचे समाजाप्रती व स्त्रीयांप्रती असणारे संवेदनशील मन ही जागृत होते त्यातूनच त्यांच्याकडून साहित्य निर्मिती झाली.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे साहित्य –**

१) काव्यफुले – सन १८५४
२) बावन्नकशी सुबोध रत्कर – सन १८९१
३) सावित्रीबाईंनी जोतीबांना लिहिलेली पत्रे –१) १०/१०/१८५६ २) २९/०८/१८६८ ३) २०/०४/१८७७
४) मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे व गाणी – १८९२.
५) जोतिबांची भाषणे – १८५६.

**क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या साहित्यामागील प्रेरणा –**

महात्मा जोतिबाफुले यांचा उल्लेख आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात 'समाज क्रांतीचे जनक' म्हणून केला जातो. कारण आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण त्यांच्या कार्यापासूनच होते. तत्कालीन समाजातील विषमता, अस्पृश्यता, अंधश्रध्दा, अनिष्ठ चालिरिती, हिंदू समाजातील ब्राह्मणवर्गाच्या सामाजिक, धार्मिक अन्याय, इ. गोष्टीं विरूध्द समाजामध्ये जागृती घडविण्याचे महान कार्य म. फुलेंनी केले. स्त्रीविषयक सामाजिक परिवर्तन फुलेंनी घरातच केले. राजकीय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरी त्यांना फार जाचक वाटली. ती नष्ट करण्यासाठी शिक्षण हाच एक उपाय आहे असे त्यांचे मत होते. म्हणून प्रथम आपली पत्नी सावित्रीबाईला शिक्षण दिले. शिक्षक बनविले. मुख्याध्यापक बनवले. हे फार क्रांतीकारक कार्य होते. आपल्या विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी व कृतीशील कार्यक्रम राबविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी विविध ग्रंथ रचना केली. 'ब्राह्मणांचे कसब;' 'शेतक-यांचा आसूड', 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म प्रकाश', 'तृतीयरत्न', 'सत्सार', 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा', 'अखंडादी काव्यरचना' इ. या त्यांच्या साहित्यातून आपल्याला फुलेंचा समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो.[४] याच विचारांचा, तत्वज्ञानाचा प्रभाव व प्रेरणेतून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे साहित्य निर्माण झाले आहे.

सत्यशोधक चळवळीच्या नियातकालिकामधून स्त्रियांच्या विषयी प्रगतशील विचार व्यक्त झाले. भारतीय समाजातील दुय्यम स्थान, धर्म ग्रंथामधील तुच्छतापूर्ण लेखन, रूढी परंपरांचा पगडा, शिक्षणाचा अभाव, स्त्री जीवनाची झालेली शोकांतिका इ. विचाराचा पुरस्कार केला गेला आहे.[५]

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे साहित्य व स्त्रीवाद –**

**१) काव्यफुले** – सावित्रिबाईंचा हा काव्य संग्रह म्हणजे त्यांची पहिली साहित्यीक रचना आहे. यामध्ये ४१ कविता आहेत. निसर्ग, समाज, प्रार्थना, आत्म स्वः, इतिहास, बोधपर इ. विषयी या कविता आहेत. यातील त्यांच्या अनेक कवितांमधून स्त्रीयांच्या उन्नतीचा मार्ग दिसतो. स्त्रीयांनी अंधश्रध्दा, रूढी, परंपरा विषमतेचा बुरखा फाडून पुरोगामीत्वाची, विज्ञानाची कास धरावी. वास्तवतेचा विचार करावा आत्मभान जागृत करावा असा उपदेश त्या देतात. स्त्रीयांच्या जीवनामध्ये अपत्यप्राप्ती ही समाज धर्म, संस्कृती इ. च्या अनुशंगाने महत्त्वाची नव्हे तर संवेदनशील

बाब मानली गेली. ज्या स्त्रीला मुल होत नाही तिला वांजोटी म्हणून हिनवल, वाळीतसुध्दा टाकल, या अमानुष अत्याचाराला समोर जायला लागू नये म्हणून स्त्री अंधश्रध्देला बळी पडलेली दिसून येते. हीच बाब लक्षात घेऊन सावित्रीबाई स्त्रीयांना उपेदश करताना म्हणतात –

**धोंडे मुले देती। नवसा पावती।**
**लग्न का करती। नारी नर।।**
**सावित्री वदते। करूनि विचार।।**
**जीवन साकार। करूनि घ्या।।**[६]

**२) बावन्नकशी सुबोध रत्नाकर –**

महात्मा जोतीबांच्या मृत्युनंतर सावित्रीबाईंनी ही साहित्य रचना केली. या ग्रंथामध्ये सावित्रीबाईंनी जोतीबांपासून आपल्याला प्रेरणा कशी मिळाली हे सांगितले आहे. तसेच देशाचा प्राचीन काळापासून इतिहासही मांडला आहे. या मध्ये त्यांनी प्रथम पती जोतिबाला प्रणाम केला आहे. महात्मा जोतीबांच्या प्रेरणेतूनच सावित्री उभी राहिली आहे म्हणजे स्त्री पुरूष परस्पर विरोधी नाहीतर पूरक असतील तरच परस्परांचा विकास शक्य आहे हे त्यांनी सांगितले आहे. त्या म्हणतात –

**जयाचे मुळे मी कवीती रचिते। जयाचे कृपे ब्रहम आनंद चित्ते।।**
**जयाने दिली बुध्दिही सावित्रीला।। प्रणाम करी मी यती जोतीबाला।।**[७]

याच ग्रंथामध्ये त्यांनी मनूस्मृतीला आपल्या टिकास्त्राने झोडपलेले दिसते.

**मनू वर्ण कल्पी विषारी विकारी। अनाचार रूढी सदा बोचणारी। स्त्रिया शुद्र सारे गुलामी गुहेत...**

या परिस्थितीतून समाजाला न्याय देण्यासाठीच छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केल्याचे त्या सांगतात.

पेशव्यांच्या काळात स्त्रियांच्यावर मोठ्या प्रमाणात अत्याचार झाल्याचा प्रखर व परखड शब्दात विरोध करतात – "तुला बोलवी रावबाजी धनी ग स्वपत्नीस धाडी निलीजा पती गा" यावरून पेशवाईतील स्त्रीयांची स्थिती व पुरूषांची स्त्रीयाप्रतीची मती किती दयनिय होते हे लक्षात येते. इंग्रजांची राजवट यामुळेच आली असे त्यांचे मत आहे. "छळी स्त्रीस शुद्रा बहू पेशवाई। अशा कारणे इंग्रजी राज्य येई।।"[८]

**३) सावित्रीबाईंनी जोतिबांना लिहिलेली पत्रे –**

यामध्ये एकूण ३ पत्रे आहेत यापैकी ता. २९ ऑगस्ट १८६८ चे पत्र सावित्रीबाईंनी नायगाव येथून लिहिलेले आहे. या पत्रामध्ये सावित्रीबाईंनी नायगाव येथे एका पोथी पुराणे वाचत फिरणा-या ब्राह्मणाने (गणेश) गावातील सारजा नावाच्या स्त्री बरोबर संबंध ठेवले. त्यातून ती गरोदर राहिली. ही बातमी गावभर पसरली. गावक-यांनी त्या दोघांना मारपीट करून धींड काढली व ठार मारण्याचा घाट घातला. सावित्रीबाईंना हे कळताच त्या तेथे गेल्या व इंग्रज सरकारची त्यांना भिती घातली. मारपीट थांबविली व त्या दोघांनी गाव सोडण्यास कबूल केले. त्यांनी सावित्रीबाईंचे आभार मानले असे म्हटले आहे.[९] या घटनेमधून समाजाचा, उच्च वर्गांचा स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात येतो. म्हणजे वापराची वस्तू समजली जात असे सावित्रीबाईंनी या गोष्टीचा विरोध केला. हे सावित्रीबाईंचे कार्य क्रांतीकारकच म्हटले पाहिजे.

**४) सावित्रीबाईंची भाषणे –**

क्रांतीज्योती सावित्रीबाईंनी विविध भाषणे दिली आहेत त्यामध्ये उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसन, कर्ज असे विषय आहेत. ही भाषणे शास्त्रीमहाघट प्रकाशकाने १८९२ मध्ये वत्सल प्रेस बडोदाच्या माध्यमातून प्रकाशित केली आहेत. या भाषणामधून सुध्दा सावित्रीबाईंचे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रगतीचे विचार, तळमळ प्रकर्षाने जाणवते.[१०]

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले – स्त्रीवाद जगताना –**

सावित्रीबाईंचे आयुष्य, त्यांचा पूर्ण जीवनपट अभ्यासला तर असे लक्षात येते की, त्यावेळी महाराष्ट्रात स्त्रीवाद ही संकल्पना औपचारिकरित्या अस्तित्वात नसली तरी सावित्रीबाई ते जगल्याचे दिसून येते. त्यांनी स्त्रीवाद शब्द वापरला नसला तरी स्त्री मुक्तीच्या वाटेवर नक्कीच मैलाचा दगड ठरल्या आहेत. त्यांचे जगण्याचे तत्वज्ञानच स्त्रीमुक्ती आहे. त्या आपलं जगणं बाई म्हणून एका विशिष्ट परिघात गिरगिरत ठेवत नाहीत. समोर येईल त्या प्रसंगाला धाडसाने स्त्रीपुरूष भेदाच्या पलीकडे जाऊन समर्थपणे व यशस्वी तोंड देतात. हाच खरा स्त्रीवाद असू शकतो.

**उपसंहार –**

समाजाची प्रगती होत असताना अनेक रूढी, परंपरा, संस्कार संस्कृतीमध्ये जे साचलेपण आले त्यातून समाजाची अधोगती होत गेली ती रोखण्यासाठी समाजातील विविध स्तरावर सामाजीक चळवळी, सांस्कृतिक चळवळी झाल्या. या चळवळीच्या प्रणेत्यांनी समाज प्रबोधनासाठी साहित्य निर्माण केले ते समाजासाठी दिशादर्शक ठरले. सामाजीक चळवळी मध्ये स्त्रीवादी चळवळ अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कारण समाजाच्या साधारण ५० टक्के महिला गृहीत धरल्या तर तो वर्ग वर्षानुवर्षे दुर्लक्षित होता. आधुनिक महाराष्ट्रात स्त्री वर्गाच्या विकासासाठी शिक्षणासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पती महात्मा जोतिबा फुले यांच्या सहकार्य व मार्गदर्शनाखाली आशिया खंडातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. कर्मठ समाजाच्या विरोधाला न जुमानता स्त्रीयांना बळ देण्याचे कार्य केले. या कामाबरोबरच महिलांच्या विकासात अडथळा असणा-या रूढी, परंपरांना कडाडून विरोध केला. बाल जरठ विवाहाला विरोध केला. विधवांच्या केशवपणाला विरोध केला. बाल हत्या प्रतिबंधक, गृह, पोटासाठी शरीर विक्रय करणा-या स्त्रीयांना सत्यशोदक कुटूंबात आश्रयास पाठविले. हे त्यांचे कार्य स्त्रीवादाच्या चौकटीत बसणारेच आहे. त्यांनी आपल्या कार्याचा प्रसार करण्यासाठी, विचारांचा प्रसार करण्यासाठी 'काव्यफुले', 'बावन्नकशी

सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह लिहीले. जोतिबांची भाषणे प्रकाशित केली. त्यांनी जोतिबांना लिहिलेली पत्रे त्यातील विषय, त्यांनी केलेले कार्य हे स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा देणे या हेतून पाहण्यापेक्षा सावित्रीबाईंनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून देण्याचा जो प्रयत्न केला तो स्त्रीवादाच्या भूमिकेतून पाहणे अत्यंत उचित ठरेल.

**संदर्भ व टिपा**


१) मराठी विश्वकोश वेबसाईट
२) प्राचार्य डॉ. साने ह. श्री., सामाजिक शास्त्रे आणि साहित्य अंतः संबंध, प्रतिमा प्रकाशन पुणे, १९९५, पृ. क्र. १५.
३) संपा. सातपुते पोपट, चळवळ आणि साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००९, पृष्ठ क्र. २२.
४) प्रा. डॉ. गव्हाणे किशोरकुमार, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५, पृष्ठ क्र. ११३
५) संपा. डॉ. जोशी चं. वि., सत्यशोधक समाज, साहित्य आणि विचार ऋतू प्रकाशन, अहमदनगर, २०१० पृ. क्र. १४५.
६) संपा. डॉ. माळी मा. गो., सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०११ पृष्ठ क्र. ३९.
७) कित्ता, पृष्ठ क्र. १३४.
८) कित्ता, पृष्ठ क्र. १३६, १३७.
९) कित्ता, पृष्ठ क्र. १३०.
१०) कित्ता पृष्ठ क्र. १४४-१५६.
११) संदर्भ – संपा. लांडे सुमती, स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २००७.